Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2406IIV12P008

e-ISSN No. 2394-8426
June-2024
Issue–II, Volume–XII

# छत्रपती शिवाजी महाराजांचा पर्यावरणीय दृष्टिकोन

लेखक :-

**मुळीक वसुदेव प्रभू**
(संशोधक विद्यार्थी)
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर

**डॉ. उमेश ए. साळूंखे**
(मार्गदर्शक)
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर

छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे लोककल्याणकारी राज्य स्थापन करणारा जगातील एकमेव आदर्श राजा होय. या महान राजाचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी पुणे जिल्ह्यातील जुन्नर जवळील शिवनेरी किल्ल्यावर राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वराज्यप्रेरक शहाजीराजे भोसले यांच्या पोटी झाला. शहाजीराजे व जिजाऊ माँसाहेब यांनी बालशिवाजीला स्वराज्य स्थापनेसाठी आवश्यक असणारा आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी, सातत्य, मुत्सद्दीपणा, राजकारण, युद्धकला, शस्त्रकला, शास्त्र, धर्मशास्त्र, भाषाशास्त्र, निर्भीडप्रवृत्ती, शूरपणा, वीरता, नेतृत्व, लोकसंग्रह, शिक्षण, उद्योग, व्यापार, अर्थशास्त्र, स्त्रियांचा आदर, विज्ञानवादी दृष्टिकोन, माणसांची पारख, प्रजाहित, न्यायदान इत्यादी अनेक क्षेत्रांमध्ये पारंगत करण्यासाठी शिक्षण दिले. त्या शिक्षणातून व संस्कारातून छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व घडत गेले.

शिवाजी महाराजांचा काळ मध्ययुगाचा म्हणजेच १७ व्या शतकाचा काळ. या काळात सर्वत्र राजेशाही पद्धतीचा अंमल होता. अनेक राजे प्रजेच्या हिताऐवजी स्वतःच्या व आपल्याच कुटुंबाच्या चैनविलासात मग्न होते. त्या काळात छत्रपती शिवाजी महाराज यांनी रयतेच्या कल्याणासाठी स्वराज्य स्थापन करून लोकांचे कल्याण करण्यासाठी जीवावर बेतणाऱ्या लढाया केल्या तसेच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक व साहित्य क्षेत्रात अत्यंत श्रेष्ठ असे कार्य करून राष्ट्रप्रेम, राष्ट्राभिमान व राष्ट्रभक्तीचा आदर्श जगाला घालून दिला. हे असे आदर्श लोककल्याणकारी राज्य स्थापन करत असताना महाराजांचा पर्यावरणाचे जतन आणि संवर्धनाबाबत दृष्टीकोन काय ? हे जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रस्तुत संशोधन पेपरसाठी ‘छत्रपती शिवाजी महाराजांचा पर्यावरणीय दृष्टिकोन’ हा विषय निवडलेला आहे.

**छत्रपती शिवाजी महाराजांची कौटुंबिक पार्श्वभूमी:**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे वडील शहाजीराजे भोसले हे सध्याच्या छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील 'वेरूळ' या गावचे होते. शहाजीराजांचे वडील मालोजीराजे भोसले व आई उमाबाई या होत्या. मालोजीराजे भोसले निजामशाही दरबारात पराक्रमी सरदार होते .शहाजीराजे पाच वर्षाचे असताना मालोजीराजे यांचे एका युद्धात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांचे बंधू विठोजी यांनी शहाजीराजे आणि त्यांचे बंधू शरीफजी यांच्या नावाने राज्य चालवले. काही दिवसानंतर निजामशहाने मालोजीराजेंकडे असलेले

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2406IIV12P008

e-ISSN No. 2394-8426
June-2024
Issue–II, Volume–XII

अधिकार व कर्तव्य त्यांच्या मुलाकडे म्हणजे शहाजीराजे व शरीफजी यांच्याकडे सोपवले. शहाजीराजेंना लहानपणापासूनच 'राजे' म्हटले जात होते. ते लहान असल्यापासून सरदार लोक त्यांना अभिवादन करत होते. कारण शहाजीराजे उत्तम बुद्धिमत्ता असलेले शक्तिवान, बलदंड, युद्धवीर होते. शहाजी प्रत्येक युद्धात विजयी होतात अशी यांची ख्याती पसरली होती. त्यांचा पराक्रम पाहून बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथील लखुजीराजे जाधव यांनी आपली मुलगी जिजाऊ शहाजीराजेनां दिली. शहाजीराजे व जिजाऊ यांचा विवाह १६१० मध्ये देवगिरी किल्ल्यावर झाला. जिजाऊंचे व्यक्तिमत्व देखिल अतिशय प्रभावी होते. त्यांचा माहेरकडील व सासरकडील वावर हा लढवय्या व सरदार घराण्यात होता. त्यामुळे त्यांना उच्च कोटीची राजनीतिची जाण होती. प्रत्यक्ष रणांगणावर जाऊन शत्रूंशी लढण्यासाठी आवश्यक असलेली शास्त्रास्त्रे चालविण्याचे प्रावीण्य आणि मनोधैर्य त्यांच्याकडे होते. शहाजीराजे व जिजाऊ यांचे पती पत्नीचे नाते जगासमोर आदर्श ठेवणारे होते. त्यांना सहा पुत्र झाले. परंतु त्यापैकी 'संभाजी' व 'शिवाजी' हे वंशवर्धक ठरले. शिवाजी स्वराज्याचे छत्रपती झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सईबाई, सोयराबाई, पुतळाबाई, लक्ष्मीबाई, काशीबाई, सगुणाबाई, गुणवंताबाई, सकवारबाई या आठ राण्या होत्या. त्यांचे छत्रपती संभाजीराजे व राजाराम हे दोन मुलं होते. सखुबाई, रानुबाई, अंबिकाबाई, राजकुमारी या मुली होत्या.

**स्वराज्य निर्मितीचे कार्य :**

छत्रपती शिवाजी महाराज वारसाहक्काने राजे झालेले नव्हते. त्यांनी स्वकर्तृत्वावर मावळयांना घेऊन आई जिजाऊ माँसाहेब व वडील शहाजीराजे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरु संत तुकाराम महाराज यांच्या प्रेरणेने तत्कालीन अराजकगतेमुळे लोकांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी स्वराज्य निर्माण केले होते. निर्माण केलेले हे स्वराज्य राज्यात राहणाऱ्या सर्वसामान्य माणसाला रयतेला आपले वाटत होते. हेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे प्रमुख वैशिष्ट्ये व वेगळेपण होते. कारण स्वराज्याचा मुख्य हेतू रयतेचे कल्याण हाच होता. यावरुन छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य हे एक राज्य नसून खऱ्या अर्थाने ती एका नूतन सृष्टीची निर्मितीच होती. 6 जून 1674 रोजी शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक रायगडावर संपन्न झाला. हा दिवस खऱ्या अर्थाने एका नव्या युगाची सुरुवात ठरला. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक फक्त राजे म्हणून मिरवण्यासाठी केला नाही तर त्यांनी गुलामगिरीत जीवन जगणाऱ्या दिन, दलित, पीडित, शेतकरी आणि शेतमजूर यांच्या मनामध्ये स्वाभिमानाचा व स्वराज्य निष्ठेचा हुंकार जागृत केला. रयतेला स्वतःच्या पराक्रमाच्या जीवावर स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग मोकळा करून दिला व राज्यशाही असली तरी खऱ्या अर्थाने लोकशाही निर्माण करून या सर्व समाजामध्ये सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समानता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. रयतेचे हित जोपासणारा आदर्श शासनकर्ता

म्हणून राज्यकारभार केला. लोककल्याणकारी राज्याची निर्मिती करणाऱ्या या महान राजाच्या राज्याभिषेकला 350 वर्षे पूर्ण होत आहेत त्या निमित्ताने या दिवसाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

**छत्रपती शिवाजी महाराजांचा पर्यावरणीय दृष्टिकोन :-**

छत्रपती शिवरायांनी शेती आणि पर्यावरण या विषयाला केंद्रभागी ठेवून राज्यकारभार केला. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांचा शेतसारा माफ केला. शेती, झाडे, पशु-पक्षी, आणि प्राण्यांना पाण्याची सोय व्हावी म्हणून विहिरी, धरणे व तलाव बांधले. शेतीपूरक व्यवसायांना बाजारपेठ उभारून शेतकऱ्यांना आर्थिक बाजूनेही सशक्त केले. तसेच शेतकऱ्याच्या शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे यासाठी महाराज नेहमी दक्षता घेत. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये, युद्धाप्रसंगी जाताना किंवा परत येताना शेतकऱ्याच्या उभ्या पिकांमधून घोडे घेऊन न जाता शेताच्या बांधावरून जाण्याचा आदेश दिला. महाराजांनी शेतकरी हिताच्या विविध योजना आखल्या त्यामध्ये गरजू शेतकऱ्यांना नांगर, बैलजोडी विकत घेण्यासाठी आर्थिक मदत करून त्याचे कर्ज माफ केले. शेतकऱ्यांने पाळलेल्या गाई, बैल, घोडा व अन्य प्राण्यांचे गनिमा पासून रक्षण करण्यासाठी सरकारी सहाय्य पुरविले. गवत हे गुरांचा चारा आहे , म्हणून आग लागून ते नष्ट होणार नाही याची काळजी घेण्याचा सल्ला दिला..

रामचंद्रपंत अमात्यांनी लिहून ठेवलेल्या आज्ञापत्रात शिवाजी महाराज सांगतात गड किल्ल्याचे रक्षण करण्यासाठी सैन्य जेवढे महत्त्वाचे आहेत त्याचप्रमाणे पर्वतरांगांमध्ये असणाऱ्या घनदाट झाडांना सुद्धा तेवढेच महत्व आहे. त्यामुळे ती आपण प्रयत्नपूर्वक वाढवावेत, या शिवाय आंबा, फणस, चिंच, वड, शिसव, लिंब, फुलांचे आणि फळांचे झाडे गडाच्या भोवताली लावून जतन करावेत. त्यांचा उपयोग गडाच्या रक्षणासाठी तर होतोच शिवाय त्यापासून फळे, साऊली आणि औषधे मिळतात व पर्यायाने झाडांमुळे पर्यावरणाचे संवर्धन आणि जतन होते, असे शिवरायांचे मत होते. याच हेतूने त्यांनी रायगड व राजगड यांच्या पायथ्याशी आमराई निर्माण केल्या.

एका आज्ञापत्रात शिवराय म्हणतात आंब्याची व सागाची झाडे आरमारासाठी अत्यंत उपयुक्त असतात परंतु ती झाडे एक किंवा दोन वर्षात येत नाहीत त्या झाडांना शेतकऱ्यांनी स्वतःच्या पोटच्या मुलाप्रमाणे वाढवलेले असते, त्यामुळे शक्यतो ते परमुलखावरून आणावेत किंवा एखादे जीर्ण झालेले झाड असेल तर ते शेतकऱ्याला मोबदला देऊन त्याच्या परवानगीने तोडून आणावे, असा महाराजांचा आदेश होता. पाण्याची उपलब्धता आहे का याचा विचार करूनच गड-किल्ल्यांची उभारणी केली जात असे. पाणी नसेल तर खडक फोडून गड किल्ल्यावर पाण्याची व्यवस्था केली. पर्जन्य काळापर्यंत पाणी पुरेल अशी मजबूत तळी व टाकी निर्माण करत. यावरून शिवाजी महाराजांचे जलसंधारणाकडे किती लक्ष होते हे समजून येते. आजही आपणास रायगडावरील तुडुंब भरलेले गंगासागर तलाव पाहिल्यानंतर शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचा परिचय येतो.

आज जगभरात औद्योगीकरणासाठी फार मोठ्या प्रमाणावर जंगल नष्ट केले जात आहेत. विकासाच्या नावाखाली जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे. दिवसेंदिवस पर्यावरणाचा फार मोठ्या प्रमाणावर ऱ्हास सुरू आहे. सध्या आपल्या देशामध्ये वाढत असलेले तापमान मानवाने पर्यावरणाकडे केलेल्या दुर्लक्षाचाच परिणाम आहे. म्हणून आपण वेळेत सावध होऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिलेला आदर्श घेऊन पर्यावरणाचे संवर्धन आणि जतन करणे गरजेचे आहे. अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांचा पर्यावरणीय दृष्टिकोन याचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

**संदर्भ सूची :-**

१) शिवचरित्र साहित्य खंड : 9 ( विविध संपादक) भारतीय संशोधन मंडळ प्रकाशन ; पुणे (१९२६ ते १९८३) पृ. क्रमांक 55

२) देशपांडे प्र. न. छत्रपती शिवाजी महाराजांचे पत्रे ; सुषमा प्रकाशन: देवपूर धुळे ( 1993) पृ. क्रमांक 84

३) आपटे वि . दा., केळकर न. ची. शिवकालीन पत्रसार संग्रह खंड-1 भारतीय इतिहास संशोधन मंडळ प्रकाशन ; प्रकाशन पुणे 1930

४) खरे ग. ह. आणि कुलकर्णी अ. रा. : मराठ्यांचा इतिहास; खंड-१ 1600 ते 1700 महाराष्ट्र विद्यालय ग्रंथ निर्मिती मंडळ प्रकाशन पुणे पृ. क्रमांक 31

५) शिवचरित्र साहित्य खंड : 9 ( विविध संपादक) भारतीय संशोधन मंडळ प्रकाशन ; पुणे (१९२६ ते १९८३) पृ. क्रमांक 45

६) खरे ग. ह. आणि कुलकर्णी अ. रा. : मराठ्यांचा इतिहास; खंड-१ 1600 ते 1700 महाराष्ट्र विद्यालय ग्रंथ निर्मिती मंडळ प्रकाशन पुणे पृ. क्रमांक 244

७) जयसिंगराव पवार शिवाजी व शिवकाळ फडके प्रकाशन पाचवी आवृत्ती 2001 पृष्ठ क्र. 37 व 39

८) कोकाटे श्रीमंत शिवाजी (२००९) 'विश्ववंद्य छत्रपती शिवाजी महाराज' जिजाई प्रकाशन पुणे . पृष्ठ क्र. 8

९) जोशी शरद (२०१४)'शेतकऱ्यांचा राजा शिवाजी' जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद. पृष्ठ क्र. 27 .